# मेट्रो ३ : २ हजारांहून अधिक कुटुंबांचे पुनर्वसन पूर्ण

**। मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यान २१२५ कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने स्पष्ट केले आहे. मेट्रो ३ मार्गिका ३३.५ किमी भुयारी मार्गाची आहे. मुंबई शहरी वाहतूक प्रकल्पाच्या धोरणांतर्गत पुनर्वसित कुटुंबांना एसआरए इमारतींमध्ये स्थलांतरित करण्यात येत आहे. प्रकल्पबाधित कुटुंबांसाठी पहिल्यांदाच इन सीटू पुनर्वसन योजना राबवत आहे. या योजनेंतर्गत प्रकल्पासाठी पाडण्यात आलेल्या ३० जुन्या इमारतींमधील ७३३ भाडेकरूंना त्याच परिसरातील तीन इमारतींमध्ये पुनर्वसन केले जात आहे. या सदनिका आधीच्या घरांच्या तुलनेने आकाराने मोठ्या आहेत. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने दिलेल्या माहितीनुसार, तळअधिक तीन मजल्यांच्या इमारतींमध्ये ४७३ निवासी सदनिका, १३३ व्यावसायिक दुकाने आणि १९ व्यावसायिक कार्यालये असणार आहेत. के २ इमारतींमध्ये ३३ दुकाने, ३८ कार्यालये सुमारे २०० घरे आणि आठ व्यावसायिक दुकाने असतील. तिन्ही इमारतींचे बांधकाम सुरू आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने या वर्षअखेरीस मेट्रो ३ च्या सिव्हिल वर्कसाठी व्यावसायिक कार्यप्रणाली सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.